तहसीलदार, हिंगणा यांचे कार्यालय, हिंगणा

-दुरध्वनी क्र. - ०७१०४-२७६१३४
Email Id - tahasildarhingna@gmail.com



संकीर्ण/एन.ए.पी.-३४/मौजा हिंगणा/२०२१-२०२२
जा.क्र. प्रस्तु/तहसिलदार/कावी-३८६/२०२२
तहसिलदार हिंगणा यांचे कार्यालय, हिंगणा
दिनांक- १८/०४/२०२२, मौजा-हिंगणा

परिशिष्ट "ब"

महाराष्ट्र जमीन महसूल संहीता १९६६ चे कलम ४२ ब मधील तरतुदीन्वये नियोजन प्राधिकरणाने बांधकाम/विकास परवानगी दिली आहे. अश्या जमिनिच्या भोगवटदारास द्यावयाची सनद

ज्याअर्थी जिल्हा नागपूर, तालुका हिंगणा, गाव हिंगणा भुमापन क्र./सर्वे क ६२ आराजी १.३० हे.आर. एकुण आराजी १.३० हे.आर. (१३००० चौ.मी.). या जमिनिचे भोगवटदार अर्जदार श्री. शशिकांत दशरथ घोटे. रा. हिंगणा ता. हिंगणा जि. नागपूर यांनी महाराष्ट्र जमीन महसूल संहीता १९६६ च्या कलम ४२-ब च्या तरतुदीन्वये निवासी अकृषिक प्रयोजनासाठी सादर जमिनिचा विकास करण्यास मुख्याधिकारी नगर पंचायत हिंगणा यांचे पत्र क्र.क जा.क /न.प.हि/न.र.वि./भु.नियमी/१८८५ दिनांक १८.१०.२०२१ अन्वये विकास / बांधकाम परवानगी प्राप्त केली आहे. ज्याअर्थी मुख्याधिकारी, नगर पंचायत हिंगणा यांनी मंजूर केलेला नकाशा या मजकुराबाबत सोबत संलग्न आहे. मंजूर अभिन्यासाच्या क्षेत्राचे विवरण खालीलप्रमाणे आहे.

AREA STATEMENT		
1	LAND AREA FOR KHASRA NO 62 (AS PER 7/12)	= 1.30Ha/13000.00 Sqm /139930.835 sqft
2	LAND AREA FOR KHASRA NO 62 (AS PER K-PRAT AND POSSESION WITHIN MINIUM BOUNDRY)	= 13000.00Sqm / 139930.835 Sqft
3	LAND AREA UNDER LAYOUT	= 13000.00 Sqm / 139930.835 Sqft
4	GRASS AREA UNDER LAYOUT	= 13000.00 Sqm / 139930.835 Sqft (100%)
5	AREA UNDER 10% RECREATIONAL OPEN SPACE & 5% PUBLIC UTILITY	= 1312.00+654.81) =1966.81 Sqm /21770.74 Sqft (15.13%)
6	AREA UNDER APPROCH AND VEIECULAR 9M ROAD FLOODING ZONE & RETAING WALL ETC	= 4938.85 Sqm /53161.78 Sqft (38.00%)
7	AREA UNDER RESIDENTIAL PLOTS	= 6094.34 Sqm /65600.00 Sqft (46.87%) – A
8	DEDUCTION OF 4.35 M TANGENT = (1/2XAX X AY)-2/3 X XY X ZZ =(1/2 X 4.35 X 4.35)-(2/3 X 5.101 X 1.319 = 4.97 Sqm (Area will be change at different plots In defierent location)	

आणि ज्याअर्थी उक्त जमीनीच्या भोगवटदाराने शासनाने, उक्त संहितेच्या कलम ४७ अ नुसार देय रुपांतर करायची व निवासी अकृषिक प्रयोजनार्थ वापरापोटी आकारणीची रक्कम पुढीलप्रमाणे निर्धारित करण्यात येते.

उपरोक्त प्रमाणे जागेचे एकुण क्षेत्रफळ १.३० हे.आर.(१३००० चौ.मी.) निवासी प्रयोजनार्थ अकृषक सारा आकारणी करावयाचे क्षेत्र १३००० चौ मी ला ०.१० पैसे प्रति चौ.मी. याप्रमाणे अकृषक महसुल कर रू. १३००/- ग्रामपंचायत सेस अकृषक कराएवढा रू. १३००/- जिल्हापरिषद सेस सारा ७ पट अकृषक कराच्या रु. ९१००/- परावर्तीत कर अकृषक सा-याच्या ५ पट म्हणजेच रू. ६५००/- असे एकुण ८२००/-चालान क्रमांक २९२८८३८ दिनांक ०६.०८.२०२० रोजी शासन खजिना दाखल केलेली आहे.

Scanned with CamScanner

त्याअर्थी आता, उक्त संहीतेमधील तरतुदीच्या आणि तदनुरुपे करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदीना आणि खालील शर्तींना अधीन राहून उपरोक्त जमिनीच्या भोगवटदारास सदर नियोजन प्राधिकाऱ्याच्या वर उल्लेखीत विकास/बांधकाम परवानगीच्या अनुषंगाने सदर जमिनीवर अनुज्ञेय करण्यात आलेला निवासी अकृषिक वापरापोटी उक्त संहितेच्या कलम ४२-ब अन्वये हि सनद देण्यात येत आहे.

१) आकारणी : उक्त जमिनीच्या भोगवटदारास उक्त जमिनीच्या संबंधात या अगोदर वसुली योग्य असलेल्या आकारणी ऐवजी वर उल्लेखित विकास / बांधकाम परवानगी प्राप्त झाल्यापासुन दिनांक ३१ जुलै २०२२ रोजी संपणाऱ्या हमीच्या कालावधीत शासनाला प्रतेक वर्षी रूपये ०.१० प्रती चौ. मी. प्रमाणे रूपये १३००/- या दराने परीगणित होणारी वार्षीक आकारणी देईल अशी उक्त कालावधी संपल्यानंतर उक्त संहिते अन्वये तहसिलदार कडून वेळोवेळी निश्चीत करण्यात येईल, अशी सुधारीत आकारणी देईल.

२) उक्त जमिनीचा भोगवटदार उक्त जमिनीवर वसुली योग्य असने सर्व कर, दर आणि उपकार भरील.

३) वरिल प्रमाणे मंजूर केलेल्या वापरामध्ये किंवा वापराच्या क्षेत्रामध्ये कोणताही बदल झाल्याम त्याची माहिती असा बदल नियोजन प्राधिकरण कडून मंजूर झाल्यापासून ३० दिवसाच्या आत तहसीलदार यांना देणे भोगवटदारावर बंधनकारक राहिल.

४) उक्त जमिनीच्या भोगवटदाराने उपअधिक्षक, भुमी अभिलेख, हिंगणा यांचे कडून मोजणी करून घेणे बंधनकारक राहिल त्यानंतरच सदर सनद प्रभावी होईल.

५) अभिन्यासातील खुली जागा व सार्वजनिक प्रयोजनाकरिता प्रस्तावित केलेल्या जमिनी व्यतिरीक्त संपूर्ण अभिन्यासातील भुखंडाचा उपयोग फक्त निवासी वापराकरीताच करण्यात यावा. तसेच भविष्यात भुखंडाचे विभाजन करू नये.

६) सदर अभिन्यासातील बांधकाम परवानगीस महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४४ व ४५ अन्वये नियोजन प्राधिकरण (नगर पंचायत हिंगणा) यांची मंजुरी घेणे आवश्यक राहील.

७) पावसाच्या पाण्याचे जलसंवर्धन (Rain Water Harvesting) ची व्यवस्था अभिन्यासात करावी लागेल.

८) नगर पंचायत हिंगणा यांचे मंजुर अभिन्यासाचे अनु क २२ विवरणातील भुखंड क ३३ ते ३९ अभिण्यासामधील विकास कामाची हमी म्हणून गहाण करण्यात आले असून नगर पंचायत चे भुखंड मुक्त प्रमाणपत्र असल्याशिवाय विकी करता येणार नाही.

त्यांची साक्ष म्हणुन तहसीलदार, हिंगणा या तहसिलदार अधिकाऱ्याने, महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या वतीने आपली सही केली आणि आपल्या पदाची मोहर लावली आहे. आणि अर्जदाराने सुध्दा यावर दिनांक / /२०२२ रोजी आपली सही केली आहे.

(भोगवटदाराची स्वाक्षरी)

(श्री. शशिकांत दशरथ थोटे.) .....

(साक्षीदाराच्या स्वाक्षऱ्या व पदनामे)

अ) .....

श्री. फिरोज अब्दुल मन्नान शेख

ब) .....

श्री. प्रमिला रामनाथ डायगव्हे

Scanned with CamScanner

(साक्षीदाराच्या स्वाक्षऱ्या व पदनामे)

अ) .....

श्री. .....

ब) .....

श्री. .....

आम्ही असे जाहिर करतो की, ज्याने सनदेवर स्वत: श्री. शशिकांत दशरथ थोटे. रा. हिंगणा ता. हिंगणा जि. नागपूर यांनी स्वाक्षरी केली, ती व्यक्ती आमच्या वैयक्तिक माहितीप्रमाणे ती जी व्यक्ती असल्याचे म्हणत आहे. ती अ व ब व्यक्ती, तीच व्यक्ती आहे आणि त्यानी या ठिकाणी आमच्या समक्ष आपली स्वाक्षरी केलेली आहे.

(प्रियदर्शनी बोरकर)
तहसीलदार, हिंगणा

प्रतीलीपी :- १. तलाठी सा. क्र. ४९ मौजे हिंगणा यांना उचित कार्यवाहीस अग्रेषित.
२. अर्जदार श्री. शशिकांत दशरथ थोटे. रा. हिंगणा ता. हिंगणा जि. नागपूर यांना माहितीस अग्रेषित.

(प्रियदर्शनी बोरकर)
तहसीलदार हिंगणा

Scanned with CamScanner